वरिष्ठ सहायक संचालक (माहिती)/ जिल्हा माहिती अधिकारी/ वरिष्ठ उपसंपादक/ जनसंपर्क अधिकारी, गट- अ (कनिष्ठ) या संवर्गात पदोन्नती देण्याबाबत.

महाराष्ट्र शासन
सामान्य प्रशासन विभाग
शासन आदेश क्रमांकः मावज-२०१८/७४/प्र.क्र.२५/३४-अ,
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई -४०० ०३२
तारीख: १४ मे, २०१८

आदेश

माहिती व जनसंपर्क महासंचालनालयातील सहायक संचालक (माहिती)/ माहिती अधिकारी/ अधिपरीक्षक, पुस्तके व प्रकाशने, गट-ब (वेतन बँड ९३००-३४८०० ग्रेड वेतन ४४००) संवर्गात कार्यरत असलेल्या खालील अधिकाऱ्यांना वरिष्ठ सहायक संचालक (माहिती)/ जिल्हा माहिती अधिकारी/ वरिष्ठ उपसंपादक/ जनसंपर्क अधिकारी, गट अ (कनिष्ठ) (वेतन बँड ९३००-३४८०० ग्रेड वेतन ५०००) या पदावर निव्वळ तात्पुरत्या स्वरुपात सेवाजेष्ठतेनुसार खुल्या प्रवर्गातील रिक्त पदावर तदर्थ पदोन्नती देण्यात येत असून कामकाजाच्या व प्रशासकीय सोयीच्या दृष्टीने त्यांची रकाना (४) येथे त्यांच्या नावापुढे दर्शविलेल्या पदावर पदस्थापना करण्यात येत आहे.

अ.क्र.	अधिकाऱ्याचे नाव व वर्तमान पदनाम	ज्येष्ठतेनुसार प्रवर्ग	पदोन्नतीचा प्रवर्ग	पदोन्नतीने पदस्थापनेचे ठिकाण, महसूली विभाग व नियुक्तीचा जिल्हा
१	२	३	३	४
१	श्री. प्रशांत सातपुते	अ.जा.	खुला	वरिष्ठ सहायक संचालक (माहिती), महाराष्ट्र परिचय केंद्र, पणजी-गोवा

२. श्री प्रशांत सातपुते यांची सदर पदोन्नती ही पुढे नमूद केलेल्या अटींच्या अधीन राहून तात्पुरत्या स्वरुपात करण्यात येत आहे:-

अ) सदर पदोन्नती मा. सर्वोच्च न्यायालय, नवी दिल्ली येथे राज्य शासनाने दाखल केलेल्या विशेष अनुज्ञा याचिका क्र. २८३०६/२०१७ मधील मा.सर्वोच्च न्यायालयाच्या अंतिम निर्णयाच्या अधीन राहून करण्यात येत आहे.

ब) सदर पदोन्नतीमुळे श्री.सातपुते यांना सेवाजेष्ठता व अनुषंगिक बाबींसाठी कोणताही हक्क राहणार नाही.

३. संबंधित नियंत्रक अधिकाऱ्यांनी श्री. सातपुते यांना नवीन नियुक्तीच्या ठिकाणी रुजू होण्याकरिता आवश्यक ती पर्यायी व्यवस्था करुन तात्काळ पदमुक्त करावे. श्री.सातपुते यांनी तात्काळ नवीन पदाचा पदभार स्वीकारुन त्याबाबतचा अहवाल शासनास विनाविलंब सादर करावा.

४. श्री. सातपुते यांनी पदोन्नतीच्या पदावर पदग्रहण केल्यापासून १ महिन्याच्या आत वेतननिश्चितीचा विकल्प द्यावा. असा विकल्प विहित मुदतीत न दिल्यास त्यांची वेतननिश्चिती महाराष्ट्र नागरी सेवा (वेतन) नियम, १९८१ मधील नियम क्र. ११ (१) (ए) अनुसार पदोन्नतीचा दिनांक विचारात घेऊन करण्यात यावी.

५. सदर शासन आदेश महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक क्रमांक २०१८०५१४१५३४३८६४०७ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Ramkisan Narayanrao Musale

Digitally signed by Ramkisan Narayanrao Musale
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=General Administration Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=e28f6332f6edfebdfb055bf154f99ec0b0d9e613209e20e7a215f026da6875ae, cn=Ramkisan Narayanrao Musale
Date: 2018.05.14 15:34:33 +05'30'

(रा. ना. मुसळे)

अवर सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत,

१. सचिव (मावज), सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय, मुंबई.
२. महासंचालक, माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, मंत्रालय, मुंबई,
३. महालेखापाल, महाराष्ट्र-१ (लेखा व अनुज्ञेयता), मुंबई,
४. महालेखापाल, महाराष्ट्र-१ (लेखा व परिक्षा), मुंबई,
५. संचालक (माहिती)(प्रशासन),माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, मंत्रालय, मुंबई,
६. संचालक (माहिती)(वृत्त व जनसंपर्क),माहिती व जनसंपर्क महासंचालनालय,मंत्रालय, मुंबई,
७. अधिदान व लेखाधिकारी, मुंबई,
८. जिल्हा कोषागार अधिकारी, सिंधुदुर्ग,
९. उप कोषागार अधिकारी, सावंतवाडी,
१०. वरिष्ठ सहायक संचालक (माहिती), महाराष्ट्र परिचय केंद्र, गोवा,
११. संबंधित अधिकारी (मावज मार्फत)
१२. निवडनस्ती.